MHAU080020362022

दाखल दिनांक – ०८.०८.२०२२.
नोंदणी दिनांक – ११.०८.२०२२.
निकाल दिनांक – ०५.०८.२०२६.
**कालावधी – ०३ वर्ष. ११ महिने. २८ दिवस.**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद यांचे न्यायालयात.**
( पिठासीन अधिकारी – श्री. ए. एच. तट्टु )

**किरकोळ फौजदारी अर्ज क्र.४४१/२०२२.** **निशाणी क्र.१९.**

१. **तस्लीम बेगम शेख अनीस कुरैशी,**
वय – ३० वर्षे, व्यवसाय – घरकाम,
रा. द्वारा–शेख सुब्हान शेख यासीन,
रा.सिल्लोड, ता.सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

२. **शेख झैन अनिस,**
वय – ६ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,
रा.अ.पा.कर्ती आई, अर्जदार क्र. १.

३. **जुनैरा शेख अनिस,**
वय – ४ वर्षे, व्यवसाय – निरंक,
रा.अ.पा.कर्ती आई, अर्जदार क्र. १. . . . **अर्जदार.**

**वि रु ध्द**

१. **शेख अनीस शेख चॉद,**
वय – ३५ वर्षे, व्यवसाय – व्यापार,
रा. फातेमा मस्जिद जवळ, स्नेह नगर, सिल्लोड ता. सिल्लोड . . . **गैरअर्जदार.**

**अर्ज – फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १२५ प्रमाणे.**

**विधिज्ञ –** अर्जदारातर्फे विधिज्ञ – **आय.आय.पठाण.**
गैरअर्जरांतर्फे विधिज्ञ – **सय्यद रिझवान.**

ATatty
08/08/26

# न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०५.०८.२०२५)

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे पोटगी मंजुर होवुन मिळण्याकरिता गैरअर्जदाराविरुध्द दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात हकीकत खालील प्रमाणेः**

२. अर्जदार क्र. १ हिचे लग्न गैरअर्जदारासोबत मुस्लीम धर्माच्या रितीरिवाजानुसार दिनांक ०८.०५.२०१० रोजी झालेले आहे. अर्जदार क्र. १ हिस गैरअर्जदारापासून अर्जदार क्र. २ व ३ अशी दोन अपत्ये आहेत. तसेच त्यांचे लग्न संबंध आजपावेतो आहेत. अर्जदार क्र. १ तिच्या आई वडिलांनी तिच्या लग्नामध्ये संसार उपयोगी वस्तू भांडी-कुंडी व सोन्या चांदीचे दाग दागिने तसेच वर दक्षिणा नगदी रोख १५,०००/- दिले होते. लग्नानंतर अर्जदार क्र. १ हिला सुरुवातीचा एक महिना चांगली वागणूक दिली त्यानंतर मात्र तिला गैरअर्जदार व त्याच्या घरच्यानी जाच देण्यास सुरुवात केली. तसेच, अर्जदार क्र. १ हिला तिच्या आई वडिलांकडून गाडी विकत घेण्यासाठी २,००,०००/- घेऊन ये नाहीतर घरातून निघून जा अशी धमकी दिली. पैशांची मागणी पूर्ण करण्यासाठी अर्जदार क्र. १ हिला शारीरिक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली.

३. गैरअर्जदार याचा गुरा ढोरांचा खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. गैरअर्जदार हा हेकेखोर असून तो अर्जदार क्र. १ हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला शिवीगाळ व मारहाण करुन शारीरिक व मानसिक त्रास देत असे. तसेच, गैरअर्जदाराच्या आई बहीण भाऊजयी व काकू यादेखील अर्जदाराला टोचून बोलून तिचा अपमान करत होत्या. पैशांची मागणी पूर्ण न केल्यास अर्जदार क्र. १ हिस तीन तलाख देण्याची धमकी गैरअर्जदार देत होता. गैरअर्जदार याने अर्जदार क्र. १ च्या अंगावरील सोने मोडून टाकले. पैशांची मागणी पूर्ण न केल्यामुळे शारीरिक व मानसिक छळ करुन अर्जदार क्र. १ हिला नांदवण्यास इन्कार करुन घराबाहेर हाकलून दिले.

४. त्यानंतर नांदवण्यास इन्कार केल्यामुळे अर्जदार क्र. १ हिने महिला समुपदेशन

केंद्र सिल्लोड येथे तक्रार दिली परंतु गैरअर्जदार तेथे हजर राहिले नाही. त्यानंतर महिला सुमपदेशन केंद्र सिल्लोड यांनी अर्जदार क्र. १ हिस गैरअर्जदार व त्याच्या घरातील इतर संदस्याविरुध्द कायदेशीर कारवाई करणेबाबत दिनांक ०८.०६.२०२० रोजी पत्र दिले. त्यानुसार गैरअर्जदार व त्याच्या घरच्यांविरुध्द भा.दं.वि कलम ४९८ अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून तो न्यायप्रविष्ठ आहे.

५. गैरअर्जदाराचा गुरे ढोरे खरेदी विक्रीचा व्यापार असून सदर व्यापारातून त्याला खर्च वजा जाता प्रतिमहा ३० ते ४० हजार रुपयापर्यंत उत्तपन्न मिळते. तसेच तो चालक देखील आहे. गैरअर्जावर अर्जदारांशिवाय इतर कोणाचीही कायदेशीर जबाबदारी नाही. तसेच, गैरअर्जदाराची मौजे उंडणगाव ता. सिल्लोड येथे गट क्र. ४५३ मध्ये वडीलोपार्जित एकत्रितरित्या बागायती शेतजमीन असून त्यापासून त्यांना खर्च वजा जाता वार्षिक ५ ते ६ लाख रुपये उत्तपन्न मिळते. तसेच, गैरअर्जदारास मौजे उंडणगाव ग्राम पंचायत हद्दीत व मौजे सिल्लोड नगर परिषद हद्दीत बापू नगर व स्नेहनगर येथे वडीलोपार्जित बांधीव घर व प्लॉट देखील आहे. गैरअर्जदाराने अर्जदारांना घरातून काढून दिल्यापासून त्यांच्या खाण्या पिण्याची, औषधोउपचाराची व शिक्षणाची तजवीज केलेली नाही. त्यामुळे अर्जदारांना खर्चासाठी १० हजार रुपये प्रतीमहा सहज देउ शकतो इतकी ऐपत आहे.

६. गैरअर्जदाराने त्याचे म्हणणे निशाणी क्र. ७ खाली दाखल केले आहे. गैरअर्जदाराने अर्जदारांचा संपूर्ण मजकूर खोटा काल्पनिक व बनावट आहे असे सांगितले आहे. गैरअर्जदाराने त्याचे लग्न अर्जदार क्र. १ हिच्यासोबत झाल्याचे व त्यांना अर्जदार क्र. २ व ३ ही अपत्य असल्याचे मान्य केले आहे. गैरअर्जदाराने पुढे असे म्हटले आहे की, अर्जदाराचे आई वडील जनावरांचा व्यवसाय त्यांच्यासोबत करायला सांगून गैरअर्जदाराला घरजावई म्हणून राहा यासाठी प्रयत्न करत होते. तसेच, दिनांक १२.१०.२०२२ रोजी अर्जदार क्र. १ हिचे हिच्या वडीलांनी व भावांनी गैरअर्जदारास शिवीगाळ केली व लाथा बुक्यांनी मारहाण केली. त्याने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार ही तिच्या मर्जीने माहेरी राहत असल्यामुळे तिला खावटीची कोणतीही आवश्यकता नाही व सदरील अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

७. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले व त्यावरील निष्कर्ष मी कारणांसहीत पुढील प्रमाणे देत आहे.

| अ. नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदाराने असे सिध्द केले आहे काय की, गैरअर्जदार हा अर्जदाराचे पालन पोषण करण्यास नकार देत आहे? | होय |
| २. | अर्जदाराने असे सिध्द केले आहे काय की, ती स्वतःचे पालन पोषण करण्यास असमर्थ आहे ? | होय |
| ३. | अर्जदाराने असे सिध्द केले आहे काय की, गैरअर्जदाराकडे अर्जदाराचे वेगळे पालन पोषण करण्याचे साधन आहे काय ? | होय |
| ४. | अर्जदार ही गैरअर्जदाराकडून पालन पोषणाचा खर्च मिळविण्यास पात्र आहे काय ? | होय |
| ५. | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो |

## कारणमीमांसा

८. अर्जदार हिने आपल्या अर्जातील कथनांच्या पृष्ठर्थ स्वतःची साक्षीदार क्र. १ म्हणून निशाणी क्र. ८ वर नोंदविली आहे. गैरअर्जदाराने स्वतःची साक्ष साक्षीदार क्र. १ म्हणून निशाणी क्र. १७ वर साक्ष नोंदविली आहे.

**मुद्दा क्र. १ ते ४ करिताः**

९. चारही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामूळे ते एकत्रीतपणे चर्चिले जात आहेत.

सदरील अर्ज सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र. १ हिने तिच्या शपथपत्रामध्ये तिने अर्जामध्ये नमूद केलेल्या मजकुराची पुनरावृत्ती केलेली आहे. तिने गैरअर्जदार हा मजुरी करतो याबाबतचे कागदपत्रे तिच्याकडे नसल्याचे कथन केले आहे. तसेच, फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ४४०/२०२२ मध्ये तिला व तिच्या मुलांना खावटी मंजूर झाली आहे हे मान्य केले आहे. परंतु, तिने सदरील अर्ज खोटा दाखल केल्याचे अमान्य केले आहे व तिला

गैरअर्जदारासोबत नांदायचे नाही, हे देखील अमान्य केले आहे. तसेच, तिला झालेल्या मानसिक व छळ कोणत्या तारखेला झाला याबाबत तिला सांगता आलेले नाही परंतु, त्यामुळे अशा निष्कर्ष निघत नाही की, सदरील घटना ही घडलेली नाही.

**१०.** गैरअर्जदार याने त्याच्या साक्षीपुराव्याच्या शपथपत्रामध्ये असे कथन केले आहे की, गैरअर्जदाराने अर्जदारांचा संपूर्ण मजकूर खोटा काल्पनिक व बनावट आहे असे सांगितले आहे. गैरअर्जदाराने त्याचे लग्न अर्जदार क्र. १ हिच्यासोबत झाल्याचे व त्यांना अर्जदार क्र. २ व ३ ही अपत्य असल्याचे मान्य केले आहे. गैरअर्जदाराने पुढे असे म्हटले आहे की, अर्जदाराचे आई वडील जनावरांचा व्यवसाय त्यांच्यासोबत करायला सांगून गैरअर्जदाराला घरजावई म्हणून राहा यासाठी प्रयत्न करत होते. तसेच, दिनांक १२.१०.२०२२ रोजी अर्जदार क्र. १ हिचे हिच्या वडीलांनी व भावांनी गैरअर्जदारास शिवीगाळ केली व लाथा बुक्यांनी मारहाण केली. त्याने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार ही तिच्या मर्जीने माहेरी राहत असल्यामुळे तिला खावटीची कोणतीही आवश्यकता नाही व सदरील अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**११.** गैरअर्जदाराने त्याच्या उलटतपासामध्ये हे मान्य केले आहे की, लग्नाच्या वेळी अर्जदार क्र. १ च्या आईवडीलांनी लग्नामध्ये संसार उपयोगी वस्तू दिल्या होत्या. तसेच, सन २०२२ पासून गैरअर्जदार व अर्जदार हे विभक्त राहत असल्याचे मान्य केले आहे. तसेच, अर्जदार क्र. १ चा पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचा पिता या नात्याने त्यांचा सांभाळ करण्याची जबाबदारी गैरअर्जदाराची आहे हे देखील त्याने मान्य केले आहे. त्यानंतर गैरअर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, त्याला दुचाकी व तीनचाकी चारचारी वाहने चालवण्याचा अनुभव आहे व तो चालक असल्याचे व त्याच्याकडे वाहन चालवण्याचा परवाना असल्याचे त्याने मान्य केले आहे. त्यानंतर, गैरअर्जदाराने त्याचे मूळ गाव उंडणगाव येथे त्याची वडीलोपार्जित जमीन व घर असल्याचे मान्य केले आहे. गैरअर्जदार हा संपूर्ण कुटंबासोबत सिल्लोड येथे राहतो व सिल्लोड येथील स्नेहनगर व बापूनगर येथे त्याच्या परिवारातील सदस्यांच्या नावे प्लॅाट असल्याचे देखील त्याने मान्य केले आहे. गैरअर्जदार व त्याच्या घरच्यांविरुध्द अर्जदार हिने भारतीय दंड संहिता कलम ४९८ प्रमाणे केस दाखल केल्याचे देखील त्याने मान्य केले आहे.

**१२.** अर्जदार व गैरअर्जदार याने दाखल केलेल्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सन २०२२ पासून अर्जदार व गैरअर्जदार हे विभक्त राहत आहे. तसेच, अर्जदार क्र. १ हिने तिच्या साक्षीपुराव्यामध्ये कथन केल्याप्रमाणे तिचा शारीरिक व मानसिक छळ झाल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार व त्याच्या घरच्यांविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८ अ प्रमाणे केस दाखल केल्याचे देखील दिसून येते. साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता हे सिध्द होते की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार हे पती पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे त्यांचे अपत्ये आहेत. गैरअर्जदाराने त्याच्या उलटतपासामध्ये त्याचे पालन पोषण करण्याची जबाबदारी त्यांची असल्याचे मान्य केले आहे व कायद्याने त्यांचे पालन पोषण करण्याची जबाबादारी ही गैरअर्जदाराची आहे.

**१३.** अर्जदार क्र. १ हिने तिचे मालमत्ता व जबाबदारीचे प्रमाणपत्र निशाणी क्र. ९ वर दाखल केलेले आहे. तसेच, गैरअर्जदार याने निशाणी क्र. १५ वर त्याचे मालमत्ता व जबाबदाराची प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. सदरील प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदारांना प्रतिमहा १० हजार रुपय खर्च लागतो व अर्जदार क्र. १ हिस कुठलाही उत्पन्नाचा स्त्रोत नाही हे दिसून येते. गैरअर्जदार याने त्याचे मासिक उत्तपन्न रुपये ६ हजार नमूद केले आहे. परंतु, त्याच्या उलटतपासामध्ये तो चालक असल्याचे त्याने मान्य केले आहे. तसेच, त्याला वडीलोपार्जित मिळकत असल्याचे देखील मान्य केले आहे.

**१४.** संपूर्ण साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता एकंदरीत गैरअर्जदाराने कोणतेही कारण नसताना अर्जदारांचा सांभाळ तथा पालन पोषण करण्यास नकार दिला आहे. अर्जदाराचा उदरनिर्वाह करण्याची जबाबदारी ही गैरअर्जदार याची असल्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदाराकडुन पोटगी मिळविण्यास पात्र आहे. अर्जदार हिने गैरअर्जदाराडुन दरमहा रक्कम रुपये १०,०००/– पोटगीची मागणी केली आहे. अर्जदार हिच्या अर्जातील पोटगीची मागणी व अभिलेखावरील गैरअर्जदाराच्या उत्पन्नासंबंधी दाखल केलेल्या पुराव्याच्या अनुषंगाने गैरअर्जदार याच्या उत्पन्नाचा विचार करता अर्जदारांना एकत्रित दरमहा रक्कम रूपये ७,०००/– पोटगी देणे न्यायोचित होईल. तसेच सदर अर्ज दाखल केला तेव्हापासुन अर्जदारांना गैरअर्जदाराने कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. अर्ज दाखल करण्यासाठी तिला आर्थिक

नुकसान सहन करावे लागले, म्हणून तिला अर्ज दाखल तारखेपासून पोटगीची रक्कम रूपये ७,०००/- मंजूर करणे न्यायाचे होईल. यास्तव मुद्दा क्र. १ ते ४ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ५ करिताः**

**१५.** वरील मुद्दे क्र. १ ते ४ च्या विवेचनावरुन मुद्दा क्र. ५ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदाराने अर्जदारांना एकत्रित दरमहा रक्कम रूपये ७,०००/- अर्ज दाखल तारखेपासून द्यावी.

३. गैरअर्जदाराने सदर अर्जाचा खर्च रक्कम रूपये ५,०००/- (पाच हजार फक्त) अर्जदार यांना द्यावा.

४. या न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. )

5/8/26

(ए. एच. तट्टु)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३,सिल्लोड.

दिनांक – ०५.०८.२०२६.
ठिकाण– सिल्लोड.